**नायब तहसीलदार, “गट-ब” संवर्गातील ०१ परिविक्षाधीन उमेदवारांच्या अधिसंख्य पदांस मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- इएसटी-२०२२/प्र.क्र.०१/ई-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर,२०२४.

**संदर्भ:-**

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०/०२/२०१६.
२. सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश क्र. टिआरएन-१०२१/प्र.क्र.३७/सीपीटीपी-ब, दि.२४/१२/२०२१.
३. सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश क्र. टिआरएन-१०२१/प्र.क्र.३७/सीपीटीपी-ब,दि.२९/१२/२०२१.
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.इएसटी-२०२२/प्र.क्र.०१/ई-८,दि.१७/०१/२०२२ व दि.११/०२/२०२२.
५. सामान्य प्रशासन विभाग,कार्यालयीन आदेश क्र.टिआरएन-१०२१/प्र.क्र.३७/सीपीटीपी-ब, दि.१३/०१/२०२२ व दि.१४/०१/२०२२.
६. सामान्य प्रशासन विभाग,कार्यालयीन आदेश,क्र.टिआरएन-०१२२/प्र.क्र.०१/सीपीटीपी-ब, दि.२५/०४/२०२२ व पत्र दि.०५/०५/२०२२.
७. महसूल व वन विभाग,शासन निर्णय,क्र.इएसटी-२०२२/प्र.क्र.०१/ई-८,दि.१६/०६/२०२२.
८. महसूल व वन विभाग,शासन पत्र क्र. सीपीटीपी-२०२१/प्र.क्र.३१९/ई-९,दि.०५/०१/२०२४.

**प्रस्तावना :-**

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या परिविक्षाधीन नायब तहसीलदार “गट-ब” संवर्गातील प्रशिक्षणासाठी हजर झालेल्या एकूण ९६+०४ उमेदवारांकरीता उपरोक्त संदर्भ क्र.०४ व ०६ अन्वये उमेदवारांकरीता अधिसंख्य पदे दि.१७ जानेवारी,२०२२ ते दि.१७ जानेवारी,२०२४ या कालावधीकरीता निर्माण करण्यात आले होते. सदर परिविक्षाधीन नायब तहसिलदार यांना सेवा ज्येष्ठतेनुसार विभागीय संवर्ग वाटप करण्याच्या प्रक्रियेस जुलै,२०२४ पर्यंतचा कालावधी लागलेला आहे. यास्तव, सदर कालावधीतील परिविक्षाधीन नायब तहसिलदार यांच्या अधिसंख्य पदास दि.१८ जानेवारी,२०२४ ते दि.३१ जुलै,२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१९ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या व सामान्य प्रशासन विभागाने प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या परिविक्षाधीन नायब तहसिलदार यांना सेवा ज्येष्ठतेनुसार विभागीय संवर्ग वाटप करण्याची प्रक्रियेस जुलै,२०२४ पर्यंतचा कालावधी लागलेला असून उपरोक्त संदर्भ क्र.०४ अन्वये ०१ परिविक्षाधीन नायब तहसिलदार यांचेकरीता निमार्ण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदास दिनांक १८/०१/२०२४ ते दिनांक ३१/०७/२०२४ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. उक्त परिविक्षाधीन नायब तहसिलदार संवर्गातील अधिसंख्य पदांच्या वेतनावरील होणारा खर्च परिविक्षाधीन उमेदवार जिल्हानिहाय प्रशिक्षणासाठी वर्ग केलेल्या जिल्ह्याकरिता “मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००)(०९३) जिल्हा आस्थापना (०१) सर्व साधारण आस्थापना (०१)(०१) आयुक्त कोकण (२०५३ ००२८)/ आयुक्त नाशिक (२०५३ ००४६)/ आयुक्त पुणे (२०५३ ००६४)/ आयुक्त अमरावती (२०५३ ००८२)/ आयुक्त नागपूर (२०५३ ०१०८)/ आयुक्त छत्रपती संभाजीनगर (२०५३ ०१२६) या लेखाशिर्षाखालील चालू वित्तीय वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि- २०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१,दिनांक २०/२/२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०९१९१५३४०९७१९ असा आहे. उक्त शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR

Digitally signed by SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=bc3e3742bf263c80937ab54c636ad893656171177467ba8656a12c226f3029a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C55205CA6D1113BFAEC735BD2D1C5326D6B007C5CD3A46A6E4C4857E58AD2AFE, cn=SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
Date: 2024.09.19 15:35:11 +05'30'

**( सुनिल कोठेकर )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.
२. संचालक,वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंपाजवळ, अमरावती रोड, नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.

५. जिल्हा कोषागार अधिकारी,(सर्व)

६. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.

७. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई - ३२.

८. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग ( सीपीटीपी-ब), मंत्रालय, मुंबई -३२

९. सह सचिव/उप सचिव (कार्यासन ब-१/ ई-९) महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई - ३२.

१०.निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.